# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/07/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## जबर दुखापत

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत मौजा राउळगाव ता. कळमेश्वर येथे दिनांक २३/०७/२०२३ चे २२/१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– अजाबराव मिटुजी बांगडे, वय ७५ वर्ष राउळगाव ता. कळमेश्वर नागपूर हा जेवन करून बसला असता यातील आरोपी नामे– १) विनोद अजाबराव बांगडे, वय ४० वर्ष हा तिथे आला व शेतीचा हिस्सा पाहिजे असे म्हटले असता फिर्यादी याने म्हटले की तु दारू पिवुन आहे उदया ये असे म्हटले असता काठीने फिर्यादीचे हातावर मारले व आरोपी क्र. २) महिला आरोपी हिने ढकलढुकल केले व शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ३२४, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार दयाराम करपाते मो. नं. ९९६०६८२४७८ पो.स्टे. कळमेश्वर हे करीत आहे.

## नवजात शिशूला उघडयावर सोडुन देणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पो.स्टे. एम.आय.डी.सी. बोरी :– अंतर्गत ०२ किमी अंतरावर टाकळघाट ता. हिंगणा येथे दिनांक २४/०७/२०२३ चे ०४.०० वा. ते ०४.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रविण भगवंतराव उमाटे, वय ४३ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ टाकळघाट यांचे टाकळघाट येथे किराणा दुकान हे मेन रोडवर असुन फिर्यादीच्या दुकानाचे घरमालक मागील बाजुस राहतात. दि २४/०७/२०२३ रोजी पहाटे ०४/०० वा. घरमालकाचे जावई यांचा फोन आला की आपले दुकानाच्या दरवाजासमोर कोणीतरी एक नवजात शिशू महीला जातीचे अंदाजे ६ ते ७ दिवसाचे बाळ पडुन असलेले दिसले असल्याने त्याचा परीत्याग करण्याचा उद्देशाने त्यास उघडया जागेवर नवजात शिशुची आई महिला हिने सोडुन दिले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एम. आय. डी. सी. बोरी येथे महिला आरोपीविरुध्द कलम ३१७ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रशांत काळे मो. क्र. ८४५९८८९१०६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर